# प्रेसनोट दि. ०९/०७/२०१८

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

## "रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडुन ३७ किलो १४० ग्रॅम गांजा जप्त"

बाहेरील राज्यातुन गांजा आणुन त्याची पुणे शहरात विक्री केली जात असल्याचे आतापर्यंतचे गुन्हयाचे तपासातुन निष्पन्न झाले होते. त्या अनुषंगाने, गांजाचा बेकायदेशीर व्यापार करणा-या इसमांवर कडक कारवाई करणेकामी, श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे व सुधीर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त, आर्थिक व सायबर, गुन्हे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहरात जोडणा-या रस्त्यावर गेली एक-दिड महिन्यापासुन, अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून पेट्रोलिंग वाढविण्यात आली होती.

दि. ०८/०७/२०१८ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक, पुणे येथील पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे, सहा.पो.फौज.दिलीप जोशी, सहा.पो.फौज.अविनाश शिंदे, पो.हवा.शिवाजी राहिगुडे, पो.ना. मनोज साळुंके तसेच दिघी पोलीस स्टेशनकडील पोलीस उप निरीक्षक फारुख सोलापुरे व पो.शि सपकाळ असे दिघी पोलीस स्टेशन हद्दीत सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत असतांना १५.२० वा. चे सुमारास पुणे-आळंदी रोड वरील, जुना दिघी जकात नाक्याजवळ सार्वजनिक रोडवर पांढ-या रंगाची स्कॉर्पिओ जीप क्रं. एम.एच.१२ जी.के.९७२१ ही रस्त्याचे कडेस उभी असलेली दिसली. सदर जीपमधील इसमाची हालचाल संशयास्पद वाटल्याने पोलीसांनी त्याचेकडे चौकशी केली असता, त्याचेकडे गांजा हा अंमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलीसांनी जीपमधील इसमाकडे असलेल्या बॅगांची तसेच जीपची झडती घेतली असता तीन बॅगामध्ये एकुण ३७ किलो १४० ग्रॅम गांजा कि.रु.५,५७,१००/- चा मिळुन आला. तो पोलीसांनी जप्त केला आहे. तसेच गांजा वाहतुकीसाठी वापरलेली वर नमुद स्कॉर्पिओ जीपसुध्दा जप्त केली आहे.

पोलीसांनी याबाबत दिघी पो.स्टे. येथे गु.रजि.नं.१८२/१८ एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क),२०(ब)ii(क) अन्वये स्कॉर्पिओ जीपमधील इसम नामे रमेश सोपान जाधव, वय - ३२ वर्षे, रा. मु.पो.केळगाव (आळंदी), ता. खेड जि. पुणे. तसेच मुळगाव मु.पो.चिंचपुर, ता. परांडा, जि. उस्मानाबाद याचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

नमुद इसम रमेश सोपना जाधव योविरुध्द यापुर्वी गांजा बाळगलेबाबत सन २०१६ साली निगडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.निरी. शिवाजी टोके, दिघी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.